**ठळक बातम्या**

- राज्याच्या विविध भागातले जलसंपदा विभागाचे अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नाबार्डकडून १५ हजार कोटी रुपयांचं दीर्घ मुदतीचं कर्ज घ्यायला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता

- उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या साथीने चंद्रपूर महापौरपदाच्या चुरशीच्या लढतीत भाजपाच्या संगीता खांडेकर यांचा एका मताने विजय

- राज्य शिक्षण मंडळाची इयत्ता बारावीची परीक्षा आजपासून सुरू

- लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा सुरू

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत नामिबियाचा नेदरलँडकडून ७ गडी राखून पराभव

**<><><><><>**

राज्याच्या विविध भागातले जलसंपदा विभागाचे अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नाबार्डकडून १५ हजार कोटी रुपयांचे दीर्घ मुदतीचं कर्ज घ्यायला राज्य मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. अपूर्ण असलेले हे ४० प्रकल्प, १०० नाले पूर्ण झाल्यावर ८ लाख एकर जमीन ओलिताखाली येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. मंत्रालयात झालेल्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह विविध मंत्री उपस्थित होते.

नवी मुंबई विमानतळाच्या जवळ तिसरी मुंबई उभारण्यासाठी MMRDA ला विविध सवलती देण्याचा निर्णयही राज्य मंत्रिमंडळानं आज घेतला. या बैठकीत पुरंदर विमानतळासाठी जमीन अधिग्रहणाला आणि त्यासाठी निधी उभारायला सरकारनं मान्यता दिली. ९६ टक्के लोकांनी जमीन अधिग्रहणासाठी तयारी दाखवली असल्यानं हे अधिग्रहण जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पूर्ण होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

राज्याच्या नवनियुक्त उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज मंत्रालयात पदभार स्वीकारला. त्याआधी सुनेत्रा पवार यांनी सिद्धीविनायक मंदीरात दर्शन घेतलं तसंच

चैत्यभूमीवर जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पचक्र अर्पण केलं. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर आदींसह आमदार, पदाधिकारी उपस्थित होते.

<><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या मदतीनं चंद्रपूरच्या महापौरपदी भाजपाच्या संगीता खांडेकर विजयी झाल्या आहेत. त्यांना ३२ मतं मिळाली तर काँग्रेसच्या महापौर पदाच्या उमेदवार वैशाली महाडोळे यांना ३१ नगरसेवकांनी पाठिंबा दिला. उपमहापौर पदी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रशांत दानव विजयी झाले आहेत. शिवसेनेच्या नगरसेवकांनी महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडणुकीत भाजपाला पाठिंबा दिला. वंचित बहुजन आघाडी आणि MIM नं या निवडणुकीत भाग घेतला नाही.

चंद्रपूरच्या विकासासाठी हे सर्व पक्ष एकत्र आल्याची माहिती आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. उद्धव ठाकरे यांच्या पक्षानं या निवडणुकीत भाजपाला पाठिंबा दिल्याचा परिणाम राज्यभर दिसून येईल असा इशारा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे. महाविकास आघाडीच्या भवितव्याबद्दल पक्षनेत्यांशी चर्चा करुन पुढचा निर्णय घेऊ असंही ते म्हणाले. MIM आणि वंचितनं या निवडणुकीत काँग्रेसला मदत दिली नाही याबद्दल सपकाळ यांनी नाराजी व्यक्त केली.

<><><><>

छत्रपती संभाजीनगरच्या महापौरपदी भाजपाचे समीर राजुरकर यांची निवड झाली आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या उपस्थितीत आज ही निवडणूक झाली. यावेळी राजुरकर यांना ७०, तर एमआयएमचे उमेदवार अशोक हिवराळे यांना ३३ मतं मिळाली. त्यामुळे राजुरकर यांची महापौर पदी निवड झाल्याची घोषणा जिल्हाधिकारी स्वामी यांनी केली. वंचित बहुजन आघाडी आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष या निवडणुकीत तटस्थ राहिले.

<><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांच्या वतीनं आयोजित इयत्ता १२ वीच्या परीक्षेला आजपासून सुरूवात झाली.

या परीक्षेसाठी एकंदर १० हजार ६६४ कनिष्ठ महाविद्यालयांमधून १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. संपूर्ण राज्यात विद्यार्थ्यांसाठी ३ हजार ३८७ मुख्य केंद्रावर ही परीक्षा होत आहे. **नाशिक** विभागातल्या **नाशिक, जळगाव, धुळे** आणि नंदुरबार जिल्ह्यांतल्या एकूण २८५ परीक्षा केंद्रांवर १ लाख ७३ हजार ६८८ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत. २८५ पैकी २६२ परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. जिल्ह्यात ८२ हजार ३३८ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत. इतर केंद्रांवरही चोख व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

प्रचलित पध्दतीप्रमाणे माहिती तंत्रज्ञान आणि सामान्य ज्ञान या दोन विषयांची परीक्षा ऑनलाईन पध्दतीनं घेतली जाणार आहे.

**<><><><><>**

सक्त वसुली संचालनालयानं उद्योजक अनिल अंबानी आणि त्यांच्या पत्नी टीना अंबानी यांना मनी लौंड्रीग प्रकरणात पुढच्या आठवड्यात चौकशीसाठी हजर राहण्याबाबत नव्यानं समन्स बजावलं आहे. टीना अंबानी यांनी आज चौकशीसाठी उपस्थित राहणं अपेक्षित असताना त्या गैरहजर राहिल्या. टीना अंबानी यांना येत्या मंगळवारी तर अनिल अंबानी यांना येत्या बुधवारी चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितलं असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

**<><><><><>**

लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ वर चर्चा सुरु झाली. काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी चर्चेला सुरुवात केली.

तत्पूर्वी सकाळच्या सत्रात लोकसभेचं कामकाज अनेकदा तहकूब झालं. सदनाचं कामकाज सकाळी ११ वाजता सुरु होताच केवळ एका मिनिटात कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत आणि त्यानंतर दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

सदनाचं कामकाज सकाळी सुरु झाल्यावर पीठासीन अधिकाऱ्यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. मात्र काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि द्रमुक सह विरोधी पक्ष सदस्यांनी घोषणाबाजी

सुरु केली. या गदारोळातच केंद्रीय पशुपालन आणि दुग्ध उत्पादन राज्यमंत्री एस. पी. सिंह यांनी प्रश्नाचं उत्तर देण्याचा प्रयत्न केला. पीठासीन अधिकाऱ्यांनी अनेकदा सूचना देऊनही गदारोळ सुरूच राहिल्यानं कामकाज तहकूब करण्यात आलं.

लोकसभेचं कामकाज वारंवार खंडित होण्याला विरोधी पक्ष जबाबदार असल्याची टीका संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केली. ते आज संसद परिसरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. विरोधी पक्षाला संसदेच्या प्रतिष्ठेबाबत कसलाही आदर नाही हे त्यांच्या वर्तनातून दिसून येत असल्याचं त्यांनी सांगितलं.

राज्यसभेत केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा सुरु आहे. शिवसेनेचे खासदार मिलिंद देवरा या चर्चेत सहभागी झाले. काँग्रेसचे खासदार पी. चिदंबरम यांनी काल सदनात चर्चेला सुरुवात केली होती.

<><><><>

आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांची एका विशिष्ट समुदायावर बंदुकीने निशाणा साधतानाची चित्रफीत प्रसृत झाल्याप्रकरणी सरमा यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करणाऱ्या डाव्या पक्षांच्या नेत्यांच्या याचिकेवर सुनावणी घ्यायची तयारी सर्वोच्च न्यायालयाने दर्शवली आहे. भाकप आणि माकप च्या नेत्यांच्या वतीने वकील निजाम पाशा यांनी ही याचिका दाखल केली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि एन व्ही अंजारीया यांच्या पीठानं याची दखल घेतली असून ही याचिका सूचिबद्ध करण्यात येईल असं सांगितलं.

<><><><>

राज्यभरात अनेक ठिकाणी उद्या पोलीस शिपाई भरती प्रक्रिया सुरु होणार आहे. जालना, नांदेड, छत्रपती संभाजीनगर तसंच अकोला जिल्ह्यात पोलीस शिपाई भरती १८ फेब्रुवारी पर्यंत घेण्यात येणार आहे. ही भरती प्रक्रिया डिजिटल तंत्रज्ञानाच्या मदतीने पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने होणार असल्याची माहिती नांदेडचे जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिली. बीड पोलीस दलात १७४ पदांसाठी ही भरती प्रक्रिया होत आहे.

<><><><>

किनारी सुरक्षा जागरुकता, राष्ट्रीय एकात्मता मजबूत करण्याच्या उद्देशाने केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाकडून कोस्टल सायक्लोथॉनचं आयोजन करण्यात आलं आहे. दमण

इथून आज सकाळी पाच वाजता या सायक्लोथॉनला सुरुवात झाली आणि ही सायकल रॅली सकाळी डहाणू समुद्र किनाऱ्यावर पोहोचली. या रॅलीत दलाचे १३० अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले आहेत. ही सायक्लोथॉन २५ दिवसांत ६ हजार ५५३ किलोमीटरचा प्रवास करत भारताचा संपूर्ण समुद्रकिनारा व्यापणार आहे.

**<><><><><>**

टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या आजच्या पहिल्या सामन्यात नेदरलँडनं नामिबियाचा ७ गडी राखून पराभव केला. नेदरलँडनं नाणेफेक जिंकून नामिबियाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं होतं. नामिबियानं प्रथम फलंदाजी करतांना २० षटकांत ८ गडी बाद १५६ धावा केल्या. नेदरलँडनं ही धावसंख्या केवळ १८ षटकात ३ गड्याच्या मोबदल्यात पार करत सहज विजय मिळवला.

आजचा दुसरा सामना न्यूझिलंड आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये होणार आहे. हा सामना थोड्याच वेळात चेन्नईच्या चिदंबरम स्टेडियमवर सुरु होत आहे. संयुक्त अरब अमिरातीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे.

आजच्या दिवसाचा तिसरा सामना संध्याकाळी ७ वाजता पाकिस्तान आणि अमेरिका यांच्या दरम्यान होणार असून हा सामना कोलंबोच्या एसएससी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे.

***//<><><><><>//***